# निशाणी क्र. २४९ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ३१ बाबत झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. वादी प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. सदर दावा हा दावा मिळकतीचे वाटप होणेसाठी दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. ३१ मयत झाल्यानंतर त्याच्या पश्चात त्याच्या वारसांविरुद्ध हा दावा चालविण्याचा वादीस अधिकार आहे असे मला वाटते. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पहाता प्रस्तूत प्रतिवादी क्र. ३१ चे वारस यांना रेकॉर्डवर घेणे आवश्यक वाटते. अबेटमेंटचा आदेश रद्द केल्यास व परिणामी प्रतिवादी क्र. ३१ च्या वारसांना रेकॉर्डवर घेण्यास परवानगी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. मात्र तसे न केल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल, परिणामी न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्याकरीता अबेटमेंटचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. मात्र झालेल्या विलंबाबाबत वादी यांनी खर्चाची रक्कम देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. सबब, प्रस्तूतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे :

## आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. पुढील तारखेपर्यंत वादी यांनी रुपये ७००/– (रु. सातशे फक्त) खर्चाची रक्कम सरकार जमा करावी.

३. वादी यांनी वरील पूर्तता केल्यानंतर अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

Digitally signed by Girish Sudarshan Mane
Date: 2019.11.19 16:46:14 +0530

स्थळ : कोरेगाव

दिनांक : १९/११/२०१९ दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.